2018-19

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019 51

11

# थोर समाज सुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचारांचा अभ्यास

**डॉ. विलास भगवानराव भिल्लारे**
समाजशास्त्र विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड

*Research Paper - Sociology*

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर समाजसुधारक होते. त्यांनी 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असे आपल्या समाजबांधवांना सांगितले. त्यांचे व्यक्तीमत्व हे अष्टपैलू होते. त्यांना सर्वच क्षेत्राचे परिपुर्ण ज्ञान होते. ते सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अत्याचार, अन्याय, अनिती यास त्यांचा प्रखर विरोध होता. ते जातीयवादाच्या विरोधी होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड आहे असे मानत. सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय समाज एकसंघ होणार नाही असे ते समजत असत. त्यांनी उच्चशिक्षण हाच अस्पृश्यांच्या उन्नतीचा अंतिम पर्याय आहे असे सांगितले. उच्च शिक्षणामुळे अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट होईल तसेच विकासही याच मार्गाने होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलीत जीवनाच्या आधार क्षितीजावर प्रथमच उगवलेला सुर्य होते. या सुर्याने सामाजिकदृष्ट्या पिछळल्या गेलेल्या व अंधकाराने जीवन जगणाज्या दलीत, शोषित, पीडीत लोकांच्या हाती प्रकाश देऊन त्यांचे जीवन प्रकाशमय केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संशोधक, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, बुध्दीमान म्हणून ओळखले जातात. ते भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारताचे पहिले कायदामंत्री होते. त्यांनी दिन-दलित, स्त्रीवर्ण, कामगार, दुर्बल, शोषीत, मागासवर्ग या सर्वांच्या विकासासाठी आपले जीवन व्यतीत केले. ते लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. लोकशाहीला ते जीवनपध्दती मानत असत. त्यांच्या मते लोकशाही हि राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित नसून जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना व्यापणारी असते. त्यामुळे सामाजिक लोकशाही प्रस्तापित होणे आवश्यक आहे. त्यांनी अनेक

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019 

सामाजिक चळवळी उभारण्याचा प्रयत्न केला. दलीतांमध्ये आत्मविश्वास व स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता प्रस्थापीत करण्यासाठी समता संघ, बहिष्कृत हितकारणी सभा, मुकनायक, बहिष्कृत भारत यासारखे संघ व वर्तमानपत्रे काढुन त्याचबरोबर माणगाव परिषद, महाडचा चवदार तळे सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, अंबादेवी सत्याग्रह करुन अस्पृश्यांमध्ये आपल्या हक्काबाबत जनजागृती निर्माण केली. भारतात हिंदू धर्माकडुन दलितांवर मोठ्या प्रमाणात अन्याय केला जात होता व या अन्यायाला दुर करण्यात ब्रिटीश सत्ता अडथळा निर्माण करत होती. डॉ. आंबेडकरांच्या मते ब्रिटीश सत्ता उलथून टाकल्यावर भारतातील दलितांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे आवश्यक होते. म्हणूनच त्यांनी घटनावादावर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडली. पश्चिमेकडील व्यक्ती स्वातंत्र्यवाद आणि भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परीस्थितीच्या प्रभावातून डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांना वळण मिळत गेले. ते विचार त्यांनी भारतीय राज्यघटनेतून व्यक्त केले. घटना निर्मिती मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. अध्यक्ष या नात्याने त्यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

घटना समितीत चर्चेच्या प्रसंगी त्यांनी केलेले युक्तीवाद महत्वाचे आहेत. टिकाकारांना त्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने उत्तरे दिली. भारताच्या घटना निर्मितीत अनेकांचा वाटा आहे. परंतू डॉ. आंबेडकरांना राज्य घटनेचे शिल्पकार म्हटले जाते. कारण घटना समितीत त्यांनी केलेले युक्तीवाद व अनेक राज्यघटनेचा त्यांनी केलेला अभ्यास तसेच सर्व घटनांचा सार भारतीय घटनेत एकत्र करण्यात त्यांनी यश मिळविले. घटनेत समाविष्ट केलेल्या तरतुदी करुन डॉ. आंबेडकरांच्या कुशाग्र बुध्दीची कल्पना येते. "घटना समितीवर मार्गदर्शन करतांना डॉ. आंबेडकर यांनी आपल्या सखोल अध्ययन व बुध्दीचा प्रत्यय दिला. त्यांचे कायद्या विषयीचे ज्ञान व घटनात्मक घट्ट पकड व त्यांच्या शब्द रचनेतील नेमकेपणा तसेच घटनेच्या मसुद्यात झालेल्या चर्चेत प्रतिबिंबीत झालेले दिसून येते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणतात."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घटनावाद भारताच्या सरकारला फार मोठे योगदान ठरते. घटनेच्या योगदानातील त्याचे विचार खालील घटकातून स्पष्ट होतात.

१) घटना समितीचे सदस्य हे जनतेचे प्रतिनिधीत्व नाही अशी टिका करण्यात येते. त्याचप्रमाणे भारतीय जनतेवर घटनेचे बंधन लादले जाते. या टिकेला उत्तर देतांना डॉ. आंबेडकर म्हणतात, भारतीय जनता सार्वभौम आहे. घटना समितीचे सदस्य सार्वभौम समाजाचे प्रतिनिधी आहेत. म्हणून घटनेत जनतेचे इच्छित प्रतिबिंब आहे. म्हणून घटना भारतीय जनतेची आहे.

२) राज्यघटना ही स्पष्ट व निश्चित करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी घटनेतील बऱ्याच उणिवा

कमी करण्याचा प्रयत्न केला. भविष्यकाळात संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी घटनेचे स्वरुप व्यापक करुन ठेवावे.

३) डॉ. आंबेडकरांनी घटनेची लवचिकता व ताठरता या दोन्ही लोकांची संगत घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणूनच भारतीय राज्यघटना ब्रिटन प्रमाणे अतिलवचिक व अमेरिकेप्रमाणे अति ताठर नाही. बदलत्या परिस्थितीचे आव्हान घटनेने स्विकारले आहे. म्हणूनच घटना दुरुस्तीचे समर्थन त्यांनी केले. घटनेच्या कलमानुसार व तरतुदीनुसार घटना दुरुस्तीच्या तीन पध्दती सांगितल्या.

४) डॉ. आंबेडकरांनी व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. म्हणूनच त्यांनी जनतेच्या मुलभूत हक्कांचा समावेश घटनेत केला. भारतात बहुसंख्य जनता गरीब आहे. त्यांना राजकारणाचे ज्ञान नाही. अशा स्थितीत जनतेच्या मुलभूत हक्कांचा संकोच होऊ नये यादृष्टीने डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक तरतुदीचा पुरस्कार केला. मुलभूत हक्कांचा संकोच होउ नये म्हणून न्यायालयाकडे दाद मागण्याची तरतुद केली आहे.

५) मार्गदर्शक तत्वांचा समावेश राज्यघटनेत केला आहे. कल्याणकारी समाज रचना हे राज्याचे उद्दिष्ट असावे. त्यासाठी नैतिक साधनांची मालकी व नियंत्रण असे ठेवावे की, जास्तीत जास्त कल्याण होईल, सर्वांना सामाजिक, आर्थिक न्याय मिळेल, त्याचप्रमाणे बेकारी, वृध्दापकाळ अपंगत्व, आजारपण इत्यादी प्रासंगिक व्यक्तीला सार्वजनिक मदत मिळाली पाहिजे. तसेच दुर्बल घटकांचे प्रामुख्याने अनुसुचित जाती जमातीचे शिक्षण व आर्थिक हितसंबंधांची जोपासना केली पाहिजे.

६) घटनेत सामाजिक व धार्मिक अल्पसंख्याकांचा हितसंबंधाचा विचार स्पष्टपणे मांडला त्याचप्रमाणे समता, स्वातंत्र्य या तत्वांना अत्यंत महत्वपुर्ण स्थान दिले आहे. प्रत्येकाला विचार, भाषा, लिपी इ. बाबतीत सुरक्षितता मिळाली पाहिजे. जात, धर्म, वंश यावरुन भेद करु नये. सर्वांना विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. सर्वांचा सामाजिक दर्जा सारखाच असावा.

७) डॉ. आंबेडकर यांना संसदीय शासन पध्दती पुर्णपणे मान्य नाही. त्यासाठी त्यांनी योग्य तडजोड करुन संसदीय पध्दतीचा स्विकार केला. मुख्यतः राष्ट्रपतींच्या घटनात्मक स्थानाविषयी उल्लेख केला आहे. राष्ट्रपतींना नामधारी प्रमुख बनवून पंतप्रधान व त्यांच्या मंत्रीमंडळाच्या हातात खरी सत्ता घटनेतून देण्याचा प्रयत्न केला आहे.

८) संघराज्य व एकात्म शासन पध्दती या दोघांचाही विचार करुन भारतीय घटनेत दोन्ही पध्दतींची सांगड घातली आहे. त्यातही जास्त कल एकात्म पध्दतीकडे आहे. म्हणूनच त्यांनी केंद्र प्रधान संघराज्याचा पुरस्कार केलेला आहे. केंद्रास प्रशासकीय कायदे विषयक,

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019 54

न्यायविषयक व आर्थिक अधिकार जास्त प्रमाणात दिलेले आहेत.

९) सत्ता स्पर्धा करणारे कायदे मंडळ व न्याय मंडळ थोडक्यात संसदीय पध्दत व संघराज्यात्मक पध्दत या दोन्ही विभागांची सांगड घालण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केलेला आहे. जनतेचे प्रतिबिंब असणारे कायदे मंडळ श्रेष्ठ असावे. म्हणून संसदीय पध्दत निवडली तर कायदे मंडळाच्या हुकूमशहीला लगाम देणारे न्यायमंडळ श्रेष्ठ असणारी संघराज्य पध्दत भारतीय राज्यघटनेकरीता निवडली आहे.

१०) प्रगत देशांच्या राज्य घटनेचा प्रभाव जरी डॉ. आंबेडकरांवर होता तरी भारताची सामाजिक, आर्थिक, राजकिय स्थिती लक्षात घेता त्यांनी घटना समितीत व घटनेच्या निर्मितीत लोकशाही धर्मनिरपेक्षता समाजवाद यांचे प्रतिबिंब उमटावे या दृष्टीने आपले योगदान केले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजवादाविषयीचे विचार :**

भारताच्या परिस्थितीचा विचार करुन डॉ. आंबेडकरांनी समाजवादाचा विचार मांडलेला आहे. त्यांनी स्वतः गरीबी अनुभवली म्हणूनच दारिद्रयाबद्दल डॉ. आंबेडकरांना अत्यंत चीड होती. त्यांच्या मते औद्योगिक यंत्रप्रधान समाज व भांडवलशाही या दोघांचा परीणाम समाजावर झालेला आहे. तसेच समाजातील विकृत प्रवृत्तीमुळे समाजाची प्रगती खुंटली. पाश्चात्य देशात भांडवलशाहीची रचना यशस्वी झाली. मात्र भारताच्या दृष्टीने ती उपयुक्त नाही. कारण भारतातील सामाजिक व आर्थिक स्थिती भिन्न स्वरुपाची आहे.

**१. भांडवलशाहीला विरोध :**

डॉ. आंबेडकरांच्या मते भांडवलशाहीमुळे संपत्तीचे केंद्रीकरण होते व त्यामुळे श्रीमंत हे जास्त श्रीमंत होतात तर गरीब हे जास्त गरीब होतात. श्रीमंत लोक ऐशआरामी जीवन जगतात, तर गरीबांना हाल अपेष्टांचे जीवन जगावे लागते. जीवनावर आधारीत अनुभव त्यांना प्राप्त होत नाहीत. भारतातील कामगार शेतकरी व अस्पृष्य यांची स्थिती अत्यंत वाईट आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते भांडवलशाहीत श्रमीकांच्या कल्याणाचा विचार केला जात नाही. त्यांचे कामाचे तास प्रमाणापेक्षा जास्त असतात. त्यांचे जीवन पशुतुल्य असते. त्यांना स्वतःचा विकास करण्यासाठी वेळ मिळत नाही. ते स्वतःच्या मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही. मुठभर लोकांना आराम मिळतो. व कामगारांना ढोर मेहनत करावी लागते. कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. आजारण, अपंगत्व, वृद काळ, बेकारी इत्यादी प्रसंगी त्यांना आर्थिक सुरक्षा मिळत नाही. तसेच वैद्यकिय व शिक्षणाच्या सवलती, करमणूक, विश्रांती इ. बाबींचाही विचार भांडवलदार करीत नाही. भांडवलदार ज्या वस्तू उत्पादीत करतो त्या वस्तू समाजहिताच्या आहेत किंवा नाही याचा तो विचार करत नाही.

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019 

**२. मार्क्सवादाला विरोध :**

डॉ. आंबेडकरांनी भांडवलशाही प्रमाणेच मार्क्सवादाला विरोध केलेला आहे. ते साम्यवादाचे कट्टर विरोधक होते. रशियातील कामगिरी त्यांना मान्य नाही. साम्यवादाला विशिष्ट कारणामुळे त्यांनी विरोध केला. ती कारणे पुढीलप्रमाणे -

अ) मार्क्सला धर्माचे तत्वज्ञान माहित नाही. त्याने धर्माला अफुची गोळी म्हटले आहे. त्याच्या मते धर्मामुळे मनुष्याच्या विवेकाला ग्लानी येते. धर्मामुळे मनुष्य स्थितीशिल बनतो. डॉ. आंबेडकरांना मार्क्सचे विचार मान्य नाही. त्यांच्या मते मनुष्य जीवनात धर्माला महत्व आहे. बौध्द धर्म साम्यवादाला चोख उत्तर देईल व साम्यवाद रोखून धरेल. कारण बौध्द धर्माने संपत्तीच्या केंद्रीकरणाला विरोध केला. बौध्द धर्माप्रमाणेच प्रेमाने जग जिंकता येते.

ब) मार्क्सने मानवी इतिहासात आर्थिक घटकांना महत्वाचे स्थान दिले. मानवी संबंध आर्थिक स्वरुपाचे असतात असे सांगितले. डॉ. आंबेडकरांना मार्क्सचा विचार मान्य नव्हता. त्यांच्या मते "मानवी संबंध अनेक प्रकारचे असतात. धर्म भावना यांचाही मानवी जीवनात महत्वाचे स्थान आहे."

क) मार्क्सवादामुळे व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट होतो. भांडवलदारीच्या गुलामगिरीतून सुटुन व्यक्ती ही सर्वंकष सत्तावादाच्या कचाट्यात सापडते व व्यक्तीचे जीवन गुलामगिरीसारखे, यंत्रासारखे बनते. पशुपेक्षाही वाईट जीवन त्याला जगावे लागते. म्हणून डॉ. आंबेडकर साम्यवादास विरोध करतात.

ड) साम्यवादी व्यवस्थेत एकपक्षीय हुकूमशाही असते. तेथे लोकशाही नष्ट होते. पक्षात देखील थोड्या लोकांच्या हातात राजकिय सत्ता केंद्रीत होतो. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादाला विरोध केला.

**३) राज्यसमाजवाद :**

डॉ. आंबेडकरांनी एका बाजूला भांडवलशाहीला विरोध केला तर दुसऱ्या बाजूला मार्क्सवादाला विरोध करुन सामाजिक समतेतून राज्य समाज वादाचा पुरस्कार केला. डॉ. आंबेडकरांनी व्यक्तीस्वातंत्र्य व समाजवाद या दोन्ही पध्दतीचा संगम केला आहे. समाजवादी विचार मांडतांना दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष दिले आहे. त्याचप्रमाणे बेरोजगारी, उपासमार यापासुन जनतेला मुक्ती देणारा विचार मांडला. आपल्या समाजवादात त्यांनी खाजगी मालमत्तेचा हक्क पुर्णपणे काढून टाकला नाही तर काही प्रमाणात खाजगी स्वातंत्र्य दिले. तसेच संपुर्णतः उद्योग धंद्यांचे राष्ट्रीयकरण केले नाही. खाजगी मालमत्तेला उपयुक्त असलेली बाजु त्यांनी लक्षात घेतली. अशारितीने भारतातील आर्थिक स्थितीचा विचार करुन त्यांनी भांडवलशाहीला व मार्क्सवादाला विरोध केला. तसेच राज्य समाजवादासाठी खालील उपाय सुचविले.

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019


१) समाजवाद निर्माण करण्यासाठी शेतीच्या उत्पादन साधनांचे राष्ट्रीयकरण करणे आवश्यक आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतीवरच पुर्णत: अवलंबून आहे. मात्र शेती जुन्याच पध्दतीने राबविली जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात धान्योत्पादन घटले आहे. म्हणून सरकारने संपुर्ण शेती ताब्यात घ्यावी, त्यामुळे उत्पादन वाढेल व अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वावलंबी बनेल. शेतीत भांडवलशाही पध्दत आहे. भांडवलदार श्रीमंत शेतकऱ्यांकडून जमीनदार व सावकाराकडुन गरीब शेतकऱ्यांची पिळवणूक होते. शेतीवर राहणारा शेतकरी हा कर्जात जीवन जगतो, कर्ज डोक्यावर घेवून मरतो, त्याचे दारिद्रय दुर करण्यासाठी आधुनिक पध्दतीने उत्पादन केले पाहिजे

२) डॉ. आंबेडकरांच्या मते खऱ्या अर्थाने समाजवाद प्रस्थापित करावयाचा असेल तर उत्पादन साधनाप्रमाणे उत्पादीत झालेल्या वस्तूच्या वितरणावरही राज्याचे नियंत्रण असणे अत्यंत आवश्यक आहे. जनतेला आवश्यक असणाऱ्या वस्तू योग्य भावात मिळतात की नाही हे बघण्याचे कार्य राज्याने करावे.

३) उद्योगधंद्यांवर सरकारचे नियंत्रण असावे. समाजवादात केवळ नफा मिळणे हा कारखान्याचा हेतू नसावा. समान सुखसोई मिळाल्या पाहिजेत. आर्थिक सुरक्षिततेची हमी राज्याने उचलावी. सर्व कामगारांचा विमा सवलतीने उतरवण्यात येईल. कामगारांचे कामाचे तास, विश्रांती, करमणूक, सुट्या व आरोग्य इ. बाबींसंबंधी नियम केले जातील.

४) स्वईच्छेनुसार काम मिळावे - भारतात व्यक्तीचा व्यवसाय हा त्याच्या वर्णानुसार ठरतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यवसाय बंदी निर्माण झाली. प्रत्येक जातीचा व्यवसाय ठरला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते प्रत्येक व्यक्तीस स्वकर्तुत्वानुसार, गुणानुसार, इच्छेनुसार ताठरता नष्ट करावी. तरच खरा आर्थिक समाजवाद यशस्वी होईल.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी जरी व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला तरी जेव्हा देशातील बहुसंख्य जनता अन्नाला महाग झाली आहे. तेव्हा व्यक्तीस्वातंत्र्यावर काही प्रमाणावर बंधणे टाकणे आवश्यक आहे. मात्र त्याचप्रमाणे अन्यायाला विरोध करण्याचा हक्क व्यक्तीला दिला. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी व्यक्ती स्वातंत्र्यावर राज्यसत्ता यांचा समन्वय साधला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करतांना प्रामुख्याने स्त्री स्वातंत्र्यविषयक, अस्पृश्यता, जाती व्यवस्था व वर्णव्यवस्था व धर्मविषयक बाबींचा विचार करावा लागतो.

**१) स्त्री स्वातंत्र्याविषयीचा विचार :**

डॉ. आंबेडकर यांनी आपल्या सामाजिक विचारसरणीत स्त्री स्वातंत्र्याचा विचार प्रामुख्याने

मांडलेला आहे. त्यात देखील स्त्रियांच्या शिक्षणाचा विचाराला महत्वाचे स्थान दिलेले आहे. महात्मा ज्योतीराव फुल्यांप्रमाणे डॉ. आंबेडकर यांना देखील स्त्री शिक्षणाविषयी अत्यंत आस्था होती. स्त्रीयांना समाजात पुरुषांप्रमाणे समान दर्जा मिळावा. असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले. त्याच्या मते स्त्री शिक्षणामुळे कुटूंबे प्रगतीपथावर जातात. जीवनमानात सुधारणा होते. म्हणूनच स्त्रियांची प्रगती झाली पाहिजे. स्त्रियांनी केवळ कपडे व दागिने यांच्यात आपला वेळ खर्च करु नये. तर त्यांनी गुणवत्तेवर भर द्यावा. बालविवाह पध्दतीला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला तर विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

**२) अस्पृश्यता विषयीचे विचार :**

डॉ. आंबेडकरांच्या मते अस्पृश्यता ही परमेश्वर निर्मित नाही, तर मानव निर्मित आहे. मानवानेच स्वतःच्या स्वार्थासाठी ती निर्माण केली. भारताच्या इतिहासात त्याचे मुळ सापडते. प्राचीन काळात दोन भटक्या जमाती होत्या. त्यातील एका टोळीचा पराभव झाला. हा पराभव झालेला गट वेगवेगळ्या ठिकाणी गेला. कारण त्यांना स्वातंत्र्य रक्षणाची व आश्रयाची गरज होती. ही पराभूत झालेली जमात स्वरक्षणासाठी स्थिर व बलवान जमातीच्या आश्रयाला गेली. तेव्हा बलवान जमातीने त्यांना गावाच्या बाहेर जागा दिली. अशा रीतीने गावाच्या बाहेर त्यांनी स्वतंत्र वस्ती केली. गावावर आक्रमण झाले तर तोंड देण्यासाठी या लोकांचा उपयोग करण्यात येत होता. या वस्तीचे लोक क्षत्रिय होते. मात्र स्थिर जमातीच्या लोकांनी त्यांना अस्पृश्य ठरवले. अशारीतीने अस्पृश्यतेचा जन्म झाला. म्हणून आंबेडकरांनी अस्पृश्यतेविरोधी विचार मांडले. या अस्पृश्यांचा छळ होवू लागला. शोषण होवू लागले. त्यांच्याकडून सर्व स्तरांची कमी प्रतीची कामे करुन घेण्यात येवू लागली. म्हणून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचे प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी पुणे, अमरावती, नासिक, महाड, इ. ठिकाणी सत्याग्रह केलेत. सामाजिक विषमता दुर करण्याचा प्रयत्न केला. दलित वर्गात सुधारणा घडवून आणण्यास त्यांनी केलेला प्रयत्न हे आईच्या ममतेप्रमाणे होते. अस्पृश्यांच्या विकासासाठी डॉ. आंबेडकर यांनी खालील मागण्या केल्या.

अ) राज्यघटनेत स्पृश्याप्रमाणेच अस्पृश्यांना समान अधिकार असावा.

ब) जे लोक अस्पृश्यता पाळत असतील त्यांना दंड व शिक्षा झाली पाहिजे.

क) सरकारने सामाजिक बहिष्कार टाकणाऱ्यांवर कायद्यामार्फत शिक्षा करावी.

ड) कायदे मंडळात अस्पृश्यांना प्रतिनिधीत्व मिळावे.

इ) सरकारी नोकरीत त्यांच्यासाठी जागा राखून ठेवाव्यात व मंत्रीमंडळातही अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधींचा समावेश असावा.

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019 

**समारोप :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात चळवळ उभारुन जनतेमध्ये प्रचंड जनजागृती निर्माण केली. परकीय गुलामीपेक्षा सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामी ही भयानक आहे याची जाणिव त्यांना होती म्हणून भारतीय संविधान लिहीण्याची सुवर्णसंधी आल्यानंतर त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून सामाजिक गुलामी कायद्याने नष्ट केली. सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या संदर्भात विचार मांडत असतांना त्यांनी फार मोठे परिश्रम घेतलेत. त्यासाठी त्यांना प्रचंड विरोध सहन करावा लागला. तरीही ते डगमगले नाहीत. आपले कार्य त्यांनी सुरुच ठेवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक क्रांतीकारक महापुरुष होते न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या चार आधारभुत तत्वांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी गौतमबुध्द, संत कबीर आणि महात्मा फुले यांना गुरु मानले. या महामानवाने समाजासाठी व देशासाठी मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संपुर्ण विश्वाला मिळालेली महान देणगी होय.

## संदर्भ सूची :-

१. प्राचार्य देवरे पी.डी. - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
२. पाटील बी.बी. - भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापुर
३. खरात शंकरराव - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, इंद्रायणी प्रकाशन, पुणे
४. चपळगावकर नरेंद्र - भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्या प्रकाशन, पुणे
५. निकम गौतम - बहुजन उध्दारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कौशल्य प्रकाशन नागपुर
६. पाटील वा. भा - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
७. डॉ. आंबेडकर बी.आर. - जातीभेद निर्मुलन, सुगम प्रकाशन, नागपुर